महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१**

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जा.क्र.शिउसं/पूवि/उमा-४०१/संकीर्ण/२०२१/902e दि.१७/०१/२०२३

23 JAN 2023

प्रति,

**मुख्याध्यापक/ प्राचार्य**
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय (सर्व)
पुणे जिल्हा

**विषय:-"मंडणगड पॅटर्न" अंतर्गत ३१ जानेवारी २०२३ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव सादर करणे बाबत**

**संदर्भ:**-जिल्हा जात पडताळणी समिती , पुणे यांचे पत्र क्र.जि.जा.प्र.प.स.पुणे/मंडणगड पॅटर्न/ २०२२-२३/३३५५, दि.०६/०१/२०२३

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्र सोबत जोडलेले आहे. त्यानुसार मंडणगड पॅटर्न नुसार राज्यातील सन २०२२-२३ मधील इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे मागासवर्गीय जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहीम राज्यात सुरु आहे. ज्या विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रलंबित आहे त्या सर्वांचे विहित मार्गाने व विहित नमुन्यात परिपूर्ण प्रस्ताव दि.३१/०१/२०२३ पर्यंत cvcpune3@gmail.com या मेलवर जिल्हा जात पडताळणी समिती , पुणे यांचेकडे सादर करावा.

जात वैधता पडताळणी प्रमाणपत्राअभावी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सोबत- संदर्भ पत्र

**(औदुंबर उकिरडे)**
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे

**प्रत:- माहितीस्तव**
संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात पडताळणी समिती, पुणे

**प्रत:- माहितीस्तव तथा आपल्या स्तरावरून सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यासाठी**
१)शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे महानगरपालिका, पुणे
३) शिक्षणाधिकारी (माध्य.), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड

# जिल्हा जात पडताळणी समिती, पुणे

जेल रोड, कॉमरझोन आय. टी. पार्कच्या मागे, येरवडा, पुणे – ४११००६
ई-मेल punecvcno.३@ gmail.com

जा.क्र.जि.जा.प्र.प.स.पुणे/मंडनगड पॅटर्न/२०२२-२३/ 335

दि. ६/०१/२०२३

प्रति,
प्राचार्य,
कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखा सर्व
जिल्हा – पुणे

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
23 JAN 2023
9280
आवक नोंदवही क्रमांक

**विषय - : "मंडणगड पॅटर्न" अंतर्गत ३१ जानेवारी २०२३ पर्यत जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव सादर करणे......**

**संदर्भ-:** १) मा. आयुक्त समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे १आणि मा महासंचालक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे जा.क्र. ५९४४ दि. १०/११/२०२२ संयुक्त परिपत्रक

२) जिल्हा जात पडताळणी समिती, पुणे जा.क्र. ४७१० दि. १५/११/२०२२ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि, मंडणगड पॅटर्न नुसार राज्यातील सन २०२२-२३ मधील ११ वी विज्ञान १२ वी विज्ञान शाखेमधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहीम संपूर्ण राज्यात सुरु आहे. सन २०२२-२३ मध्ये ज्या प्रवेशीत विदयार्थी यांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रंलबित आहे त्या सर्वाचे नावे व प्रस्ताव शाळा परिपुर्णरित्या तयार करुन सदर विषयाची माहिती जिल्हा जात पडताळणी समिती, पुणे या कार्यालयास तात्काळ समतादूत/गृहपाल यांचे मार्फत **cvcpune३@gmail.com** या ई-मेल सादर करावी. याबाबत कोणतीही हयगय होणार नाही आणि कोणत्याही मागासवर्गीय विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्रा अभावी प्रवेशापासून वंचित राहणार नाही यांची दक्षता घ्यावी. या बाबतचा संदर्भ क्र. २ नुसार आपल्याशी पत्रव्यवहार झालेले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ नुसार दि. १५/११/२०२२ पासून ६/०१/२०२३ पर्यंत आपल्या कनिष्ठ विद्यालया मार्फत या कार्यालयास १००% मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेले नाहीत. पुनश्चःआपणास कळविण्यात येते की, आपण आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सन २०२२-२३ मधील ११ वी विज्ञान व १२ वी विज्ञान शाखेमधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी चे ऑनलाईन अर्ज भरून हार्ड

कॉपी प्रस्ताव दि. **३१ जानेवारी २०२३ पर्यत समितीस सादर करावेत. आपण हे प्रस्ताव विहित वेळेत जमा न केल्यास तसेच यदा कदाचित जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र अभावी विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रम प्रवेश न मिळाल्यास** जिल्हा जात पडताळणी समिती, पुणे जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

सोबत – माहितीपत्रक

(संतोष जाधव)
संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी
समिती, पूणे

प्रत माहितीस्तव सविनय –

1) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे- ०१
2) मा. महासंचालक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
3) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे -आपणास विनंती करण्यात येते की, आपण कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य यांना आपल्या स्तरावरून योग्य ते आदेश देण्यात यावे.

# (विद्यार्थ्यांकरिता आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी)

- WWW.BARTI.MAHARASHTRA.GOV.IN या वेबसाईव्दारे CCVIS लिंकवरून ऑनलाईन फॉर्म भरणे
- सदर अर्जाची प्रिंट-आऊट काढून त्यावर अर्जदाराचा फोटो चिटकवून संबंधित कॉलेजचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्का घेणे
- उमेदवाराचा जातीचा दाखला पुणे जिल्हयातील असणे अनिवार्य आहे
- कॉलेजचे बोनाफाईड लेटर व कव्हरींग लेटर जोडणे आवश्यक आहे
- अर्जदाराच्या जातीच्या दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- अर्जदाराच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy);
- वडीलांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- वडीलांच्या जातीचा दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- सख्खे चुलते किंवा आत्या यांच्या शाळा सोडल्याची झेरॉक्सप्रती (Attested/True Copy)
- आजोबांच्या शाळा सोडल्याची दाखल्याची झेरॉक्सप्रत (Attested/True Copy)
- (विदयार्थ्यांकरिता) विशेष कार्यकारी अधिकारी तथा दंडाधिकारी यांचेसमोर /नोटरी वकील अगर नागरी सुविधा केंद्र, यांचेकडून साध्या पेपरवर नमुना १६, १७ व ३ मध्ये शपथपत्र व वंशावळ करुन आणणे
- वर नमूद वंशावळ व प्रतिज्ञापत्राचे नमुने ऑनलाईन अर्जाची प्रिंट-आऊट काढल्यानंतर अर्जासोबत उपलब्ध होतात.
- अनुसूचित जाती (S.C.) १९५० पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- इतरमागास प्रवर्ग (O.B.C.) १९६७ पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- भटक्या जाती/जमाती (V.J.N.T) १९६१ पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- विशेष मागासप्रवर्ग (S.B.C.) १९६७ पूर्वीचे संबंधित जातीचे/जातदर्शक पुरावे आवश्यक
- (इतर महसुली पुरावे) वडीलांच्या नावे/आजोबांच्या अगर पंजोबांच्या नावे गाव नमुना नं- १४ किंवा ७/१२/८-अ चा उतारा/हक्काचे पत्र/कडई पत्र/ वारस रजिष्टर नोंद/महसुली पुरावे अगर मृत्यूचे दाखले/शेती अगर घर खरेदी नोंदीचे उतारे/प्रॉपर्टी कार्ड/ संबंधित व्यवसायाचे जुने पुरावे/दुकान परवाना (ज्यात जातीची नोंद आहे असे)
- ऑनलाईन फॉर्म भरताना काही अडचण आल्यास 18002330444 या टोल फ्रि क्रमांकावर संपर्क साधावा
- महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २३ मे २००१, नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्या संबंधातील जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कलम ३ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत आणि या अधिनियमान्वये सक्षम प्राधिका-याकडून किंवा पडताळणी समितीकडून किंवा अपील प्राधिका-याकडून करण्यात येणा-या कोणत्याही चौकशीच्या बाबतीत किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या न्यायचौकशीच्या बाबतीत (आपण त्या जातीचे जमातीचे किंवा वर्गाचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणा-या अर्जदार व्यक्तीवर असेल.)

## प्रपत्र -अ

<table>
<tr><th>अनु क्र.</th><th>तपशील</th><th colspan="5">माहिती</th></tr>
<tr><td>१</td><td>महाविद्यालयाचे नाव</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>२</td><td>महाविद्यालयाचा पूर्ण पत्ता</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>३</td><td>महाविद्यालयाचा दूरध्वनी नंबर STD कोड सह</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>४</td><td>महाविद्यालयाचा ईमेल आयडी</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>५</td><td>मा .प्राचार्य यांचे नाव</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>६</td><td>मा .प्राचार्य यांचे मोबाईल क्रमांक</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>७</td><td>जात पडताळणी संबधित काम पाहणारे कर्मचारी यांचे नाव</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>८</td><td>कर्मचारी यांचे मोबाईल क्रमांक</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>९</td><td>समान संधी केंद्रावर नियुक्त समन्वयक अधिकारी यांचे नाव व पदनाम</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td rowspan="2">१०</td><td rowspan="2">११ वी विज्ञान शाखेमधील सन २०२२-२३ मधील विद्यार्थी संख्या</td><td>अजा</td><td>विजाभज</td><td>विमाप्र</td><td>इमाव</td><td>एकूण संख्या</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td rowspan="2">११</td><td rowspan="2">१२ वी विज्ञान शाखेमधील सन २०२२-२३ मधील विद्यार्थी संख्या</td><td>अजा</td><td>विजाभज</td><td>विमाप्र</td><td>इमाव</td><td>एकूण संख्या</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

**प्राचार्य सही व शिक्का**

## प्रपत्र -ब

महाविद्यालयाचे नाव -:

११ वी शाखा विज्ञान

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | जात | जाती चा प्रवर्ग | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | जातीचा दाखला प्राप्त / अप्राप्त | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त/अप्राप्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |
| ९ | | | | | | | |
| १० | | | | | | | |
| | | | | | | | |

गोषवारा

| अनु क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | जातीचे प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी संख्या | |
| २ | जातीचे प्रमाणपत्र अप्राप्त विद्यार्थी संख्या | |
| ३ | जात वैधता प्रमाणपत्र धारक विद्यार्थी संख्या | |
| ४ | जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त विद्यार्थी संख्या | |
| | एकूण | |

**टीप – सदर माहिती MS-EXCEL मध्ये Times New Roman मध्ये टाईप करावी.**

दिनांक

महाविद्यालयाचे नाव -:　　　　　प्रपत्र क　　　　　प्राचार्य सही व शिक्का

१२ वी शाखा विज्ञान

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | जात | जाती चा प्रवर्ग | भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | जातीचा दाखला प्राप्त / अप्राप्त | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त/अप्राप्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |
| ९ | | | | | | | |
| १० | | | | | | | |
| | | | | | | | |

गोषवारा

| अनु क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | जातीचे प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी संख्या | |
| २ | जातीचे प्रमाणपत्र अप्राप्त विद्यार्थी संख्या | |
| ३ | जात वैधता प्रमाणपत्र धारक विद्यार्थी संख्या | |
| ४ | जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त विद्यार्थी संख्या | |
| | एकूण | |

टीप — सदर माहिती MS-EXCEL मध्ये Times New Roman मध्ये टाईप करावी.

दिनांक

प्राचार्य सही व शिक्का